नि. दिवाणी दा. क्र.३०८/२०२४

निशाणी क्र. २० वर

शरद जाधव वि. आयाज्ञ शेख व इतर

**वादी तर्फे साक्षीदार क्र. ०१**

**वादी साक्षीदाराचा शपथेवर पुढील सरतपास श्री. एच. एस. जाधव वकिल यांचेमार्फत–**

शपथपत्रातील मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझ्या सह्या आहेत. मी प्रस्तुत प्रकरणात प्रतिवादीने माझ्या लाभात करून दिलेले रजिस्टर साठेखताचा मुळ दस्त दाखल केला आहे. आता मला सदरचा दस्त दाखविला. त्यावर माझी सही आहे, तसेच रियाज शेख याची देखील सही आहे. तसेच त्यावर साक्षीदारांच्या सह्या आहेत. सदरचा **दस्त** हा गट नं. ४९५ बाबतचा आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २७** देण्यात येत आहे. गट नं. ४९५ चा ७/१२ उताऱ्यास **निशाणी २८** देण्यात आली. मी आय्याज रियाज शेख यास श्री. जगदाळे वकील यांच्यामार्फत नोटीस दिली होती. आता मला अभिलेखावरील नोटीसीची स्थळप्रत दाखविली. त्यावर माझी सही असुन वकीलांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी २९** देण्यात आली. पोस्टाचे दोन पाकीटास **निशाणी ३० व ३१** देण्यात आली व पोस्ट पावत्यांना **निशाणी ३२ ते ३४** देण्यात आली.

तसेच मी सन २००९ मध्ये रियाज महमंद शेख याचेकडून गट नं. ४९५ मधील ८० आर क्षेत्राबाबत केलेल्या खरेदीदस्ताची सत्यप्रत अभिलेखावर दाखल केली आहे. आता मला सदरचा दस्त दाखविला. त्यावर माझी सही आहे, तसेच रियाज शेख याची देखील सही आहे. तसेच त्यावर साक्षीदारांच्या सह्या आहेत. सदरचा **दस्त** हा गट नं. ४९५ क्षेत्र ८० आर बाबतचा आहे. सदरचा खरेदीदस्त हा मुळ प्रती प्रमाणे खरा व बरोबर आहे. सदरच्या खरेदीदस्ताच्या प्रतीस **निशाणी ३५** देण्यात आली. तसेच दिनांक ०८/०२/२०२४ चे शासन परिपत्रक दाखल केले आहे त्यास **निशाणी ३६** देण्यात आली आहे. तसेच मी प्रस्तुत प्रकरणी उपविभागीय अधिकारी फलटण यांचे दिनांक ०६/०९/२००३ रोजीचे पत्र अभिलेखावर दाखल केले आहे. त्यास **निशाणी ३७** देण्यात आली. गट नं. ४९५ चे एकत्रीकरण उताऱ्यास **निशाणी ३८** देण्यात आली आहे.

**नि. दिवाणी दा. क्र.३०८/२०२४**

**वादी साक्षीदाराचा प्रतिवादी क्र. १ ते ३ तर्फे उलटतपास –**

प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचा पुकारा केला असता गैरहजर. प्रकरण प्रतिवादी क्र. १ विरुध्द विनाकैफियत व प्रतिवादी क्र. २ व ३ विरुध्द एकतर्फा असल्याने उलटतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती

दिनांक : ०९/०६/२०२६ **(व्ही. एस. वाघ )**

ठिकाण : फलटण २रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, फलटण